# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक १०-१०-२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार **दिनांक १० ऑक्टोबर २००७ रोजी** मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे् दुपारी ३-५५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बमने पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्यीन
१६. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२४. स.स.श्रीमती शिंदे मीराबाई रामराव
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.सौ.विमल तुकाराम बेंद्रे
२७. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२८. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्यीन

३२. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३३. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३४. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३५. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३६. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३७. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३८. स.स.सौ.राऊत छाया विलास
३९. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४०. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४२. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४३. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४४. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४५. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४६. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४७. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४८. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
४९. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५०. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५१. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५२. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५३. स.स.डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५४. स.स.श्री.खुडे विजय किसन
५५. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५६. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५७. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५८. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५९. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६०. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६२. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६३. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६४. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६५. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६६. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६७. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७१. स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
७२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७३. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७४. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ

७५. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
७६. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
७७. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७८. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) गुलाबचंद व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**चर्चा :**

श्री.संजय जगताप :नांदेड महानगरपालिकेत कॉग्रेस आय पक्षाचे जास्त सदस्य निवडून आलेले आहे. बहुमत झाले आहे. त्याबद्दल मा.अशोक चव्हाण यांचा अभिनंदनाचा ठराव घेण्यात यावा.

मा.महापौर या महापालिकेचा हा विषय होवू शकत नाही जर महापालिकेने या शहरासाठी जर चांगले काम केले असेल तर तसा ठराव घेता येतो.

श्री.संजय जगताप : अभिनंदनाचा ठराव घेण्यात यावा.

श्री.सय्यद खुसरो :कोणतेही अभिनंदनाचे ठराव पारित करणार नाही असे रूलींग देणार आहात काय?

मा.महापौर : हा सभागृहाचा विषय होऊ शकत नाही. विषय क्र.१

श्री.संजय शिरसाट :अगोदर चर्चा घेण्यात यावी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे त्यावर चर्चा करायची आहे.

श्री.सय्यद खुसरो : ३ ची सभा ४ ला सुरू होत आहे. ५-३० ला संपवावे.

श्री.कंवरसिंग बैनाडे :इतर महानगरपालिकेत सभेत अगोदर चर्चा होते नंतर विषयपत्रिका घेतली जाते.

मा.महापौर :अगोदर विषयपत्रिका घेण्यात येत आहे त्यानंतर चर्चेसाठी वेळ देण्यात येईल.

**विषय क्र. ११५७/०१ :**

दिनांक ०२.०८.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ०२.०८.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र.११५८/०२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन दलाच्या आपतकालीन व्यवस्थापनांतर्गत ग्राउंड कॉक्रीटींग करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. या आर्थिक वर्षात अग्निशमन दलाचे साहित्य खरेदीसाठी रुपये १.०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे. सदर आर्थिक तरतुदीमधून अग्निशमन दलाचे ग्राऊंड कॉक्रीटींग करण्यासाठी रक्कम रुपये ९,९८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी अग्निशमन दलाचे साहित्य खरेदी या लेखाशिर्षकातून सदर कामाचा खर्च

भागविणेसाठी तरतूद वळती करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉयः प्रशासनाचे १०-१० लक्षचे प्रस्ताव येतात परंतु वार्डात कोणतेही विकास काम होत नाही माझ्या वार्डातील १५ लक्षचे काम होते झाले नाही निधी अभावी मागे दोन वर्षात १५.५० लक्षचे काम झाले जाणूनबूजुन काम होत नाही.असा माझा आरोप आहे.या प्रस्तावास विरोध नाही परंतू वार्डातील विकास कामे सुध्दा झाली पाहिजे. अर्थसंकल्पातील काम होत नाही.

श्री.सलीम खान :माझ्या वार्डातही गेल्या सात आठ महिण्यात कोणतेही विकास काम का झालेले नाही याचा खुलासा मा.आयुक्तानी करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रस्ताव रद्य करावा. वार्डाच्या विकास कामासाठी वापरावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :वार्डातील विकास कामे का होत नाही याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त : बजेट मध्ये पास केलेली वार्डातील कामे व्हायला पाहिजे याबद्दल प्रशासनाचे दुमत नाही. कोणत्या वार्डात कोणत्या कामासाठी किती बजेट ठेवलेले होते कोणती कामे झालेली आहे कोणती सुरू आहे कोणकोणत्या कामाच्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत याची प्रशासन सात आठ दिवसात माहिती घेवून सभागृहा समोर सादर करील. जोपर्यत उत्पन्न येत येत नाही तोपर्यत खर्चही करू शकत नाही. ६०-७० कोटी बजेट सर्वसाधारण सभेने वाढविलेले आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे :सन २००५-०६ या वर्षाच्या बजेट मधील कामे झालेली नाही प्रत्येक कामाच्या संचिकांमागे नगरसेवकांना फिरावे लागते हे बरोबर नाही. ५० लाखा पर्यंतच कामे होतील. असे असेल तर बजेट मध्ये तरतूद कशाला ठेवलेली होती.

मा.आयुक्त : आम्ही अर्थसंकल्प ठेवला, स्थायी समिती, सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन मंजुर केला. महापालिकेच्या तिजोरीचा जसजसे उत्पन्न जमा होईल तसतसे विकास कामासाठी खर्च करता येईल.

श्री.कंवरसिंग बैनाडे :ज्या प्रमाणात मालमत्ता कर तसेच पाणी पट्टी वसूली होणे अपेक्षित होते ती न झाल्यामूळे विकास कामे होत नाही. किती वसुली झाली वार्ड कार्यालय निहाय माहिती दयावी.

मा.आयुक्त :प्राक्टीकली समजून घ्यावे. ७० कोटी वाढ केली. ते करणे शक्य होणार नाही. कराची किती वसुली झाली याची माहिती सभागृहाला मिळेल परंतू बजेट मध्ये दरवर्षी सभागृहाने टारगेट वाढवून दिल्यास सर्वच कामे होणे शक्य नाही. अर्थसंकल्पाची अमलबजावणी करणे आपण सर्वांची जबाबदारी आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : स्थायी समिती, सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली विकास कामे आतापर्यत झालेली नाही. वसूली करण्याचे काम प्रशासनाचे आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :वसूली करण्याचे काम प्रशासनाचे असते. वसूली का होत नाही याचा प्रशासनाने कारणे शोधावी ज्या वार्डातून वसूली जास्त झालेली आहे त्या वार्डात वसूलीच्या प्रमाणात निधी विकास कामासाठी खर्च करावा.

श्री.कंवरसिंग बैनाडे : माझ्या वार्डात डांबरीकरणाच्या कामाचे टेंडर झाले परंतू अदयाप काम झालेले नाही. गेल्या वर्षी डांबरीकरणाचे कामांवर मशीन खराब झाली म्हणून काम झालेले नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉयः५०-५० लक्षची कामे ठराविक सदस्यांच्या वार्डात केली आमच्या वार्डात कोणतेही काम केलेले नाही.

अति.शहर अभियंता :स.सदस्यांनी ज्या कामाच्या संदर्भात मुद्या मांडला त्या संबधी संचिका पाहून स.सदस्यांना लेखी कळविण्यात येईल.

श्री.सलीम खान : ज्या कामाची बजेट मध्ये तरतूद आहे तीही कामे होत नाही माझ्या वार्डातील ३लक्षचे लाईटचे काम झालेले नाही.

श्री.संजय जगताप :वार्ड अभियंता श्री.रामटेकेची त्वरीत बदली करण्यात यावी त्याचे काम समाधान कारक नाही.

मा.महापौर :प्रशासनाने याचा विचार करावा.

श्री.मो.जावेद मो.इसाकःया वर्षाचे सहा महिन्याचा कालावधी गेलेला आहे.वार्डातील विकास कामास केंव्हा सुरूवात होणार आहे. वर्क ऑर्डर देऊन सुध्दा कामे झालेली नाही.

मुख्य अग्निशमन अधि. :आपतकालीन व्यवस्थपनांतर्गत ग्राउंड कॉक्रीटींग करण्यास हा खर्च लागणार आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉयःहे काम १० लक्ष पर्यंत जाईल पून्हा वाढीव कामाचा प्रस्ताव येईल प्रशासनाचे सर्व कामे मंजूर करून घेण्यात आहे परंतू वार्डातील कामेच होत नाही.

मा.महापौर :स.सदस्य यांनी विकास कामा बाबत सूचना केल्या संबधीत अधिकारी यांनी विकास कामे करण्याची कार्यवाही करावी.हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :ज्या भागात काम करणे आवश्यक नाही ते काम थांबवून इतर ठिकाणी खर्च करावे.

श्री.सलीम खॉन : माझ्या वार्डातील हायमास्ट बसविण्याचे काम दोन तीन दिवसाच्या आत करण्याचे आदेशित करावे.

श्री.देसरडा प्रशांत : ज्या कामासाठी बजेट ठेवले होते त्याकामासाठी का खर्च झालेले नाही अग्निशमन विभगाची दुर्दशा झालेली आहे त्या विभागाकडे लक्ष देण्याची गरज आहे या विभागासाठी असलेल्या निधीतून आपतकालीन सेवा आहे, साहित्य अद्यापपर्यंत का खरेदी केलेले नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :अनेक विकास कामाच्या संचिकेवर चर्चा करावी असा शेरा दिला जातो परंतू किती दिवसात चर्चा करावी याला लिमीट दिले जात नाही ८ व्या महिण्यातील संचिका १० व्या महिण्या पर्यत चर्चेसाठी पडून असते, सर्वसाधारण सभेत अनेक प्रस्ताव मंजूर होतात परंतू ती कामे होत नाही. याला अर्थ नाही वसुली का होत नाही हे पाहण्याची सुध्दा गरज आहे.मालमत्ता कर तसेच पाणीपटटी वसूलीसाठी जकातीचे स्वच्छतेचे खाजगीकरण करून तेथील कर्मचारी वसूलीसाठी घेता येईल हा त्या मागचा हेतू होता परंतू झोन कार्यालयातील जेवढे कर्मचारी त्याचा पगारावर जेवढा खर्च होतो तेवढी वसूली सुध्दा त्या त्या झोनमधील झालेली नाही अशी परीस्थिती आहे. जबाबदारी निश्चित करावी वसूली झाली तर विकास कामे करता येईल.

श्री.भगवान घडमोडे : प्रस्ताव मंजूर करण्यास विरोध नाही, परंतू वसूली का होत नाही प्रशासन ठप्प झालेले आहे वसुली नाही म्हणून वार्डात ५-५ लक्ष रक्कमेची सूध्दा विकास कामे होत नाही.१० लक्षचा हा प्रस्ताव मंजूर करीत आहे. हे कितपत योग्य आहे.

श्री.वसंत नरवडे :प्रशासकीय कामाचे ठराव तात्काळ मंजूर होवून केली जाते परंतु वार्डातील अत्यावश्यक कामे सुध्दा होत नाही हे योग्य नाही.

मा.महापौर :प्रशासनाला वार्डातील विकास कामे करण्या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, या आर्थिक वर्षात अग्निशमन दलाचे साहित्य खरेदीसाठी ठेवण्यांत आलेल्या रुपये १.०० कोटीच्या तरतुदीमधून अग्निशमन दलाचे ग्राऊंड कॉक्रीटींग करण्यासाठी रक्कम रुपये ९,९८,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५९/०३ :**

A) आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या सर्वोच्च समिती असलेल्या सल्लागार समितीची स्थापना करण्यास दि.१९.०३.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.४२/७ अन्वये मान्यता दिली होती. सल्लागार समिती मधील सदस्य खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.महापौर | - | अध्यक्ष |
| २. | मा.आयुक्त | - | सदस्य |
| ३. | डॉ.गंगाधर पानतावणे | - | सदस्य |
| ४. | प्रा.सुधाताई काळदाते | - | सदस्य |
| ५. | डॉ.पी.एस.बोरा | - | सदस्य |
| ६. | डॉ.मोरवंचीकर | - | सदस्य |
| ७. | डॉ.सुधीर गव्हाणे | - | सदस्य |
| ८. | डॉ.वि.ल.धारुरकर | - | सदस्य |
| ९. | समन्वयक/ संचालक संशोधन केंद्र | - | सदस्य सचिव |

संपादक मंडळ सल्लागार समितीच्या बैठक प्रसंगी साहित्यीकांना उपस्थिती भत्ता प्रत्येकी रु .२००/- देण्यात यावा. तसेच या व्यतिरीक्त प्रति बैठक रु.३०००/- किरकोळ खर्चास मान्यता मिळावी.

B) मनपा तर्फे प्रकाशित करावयाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन (गौरव) ग्रंथाच्या संपादक मंडळातील डॉ.गंगाधर पानतावणे यांना वगळता इतर सदस्यांनी संपादन प्रक्रियेमध्ये फारसे स्वारस्य न दाखविल्यामुळे आणि डॉ.गंगाधर पानतावणे हे एकटेच परिश्रम घेत असल्याने संपादक म्हणून त्यांना मान्यता देऊन मानधन रु.१५,०००/- डॉ.पानतावणे यांना देण्यात यावे. व प्रकाशन समारंभात त्यांचा यथोचित सत्कार करण्यांत यावा.

C) सन २००२-०३ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन ग्रंथाच्या फक्त ५०० प्रतींची छपाई करण्याचे ठरले होते. त्यावेळी सुमारे २०० पृष्ठांचा ग्रंथ होईल असे अपेक्षित होते. निविदा मागवून निश्चित करण्यात आले त्यावर्षीचे दर प्रति ग्रंथ रुपये १९५/- असे प्राप्त झाले होते. आता पृष्ठसंख्या सुमारे ३६५ झाली आहे. हया ग्रंथाची विक्री होण्याची शक्यता लक्षात घेऊन १५०० प्रतींची छपाई करण्यात आली आहे. छपाईसाठी सन २००२-०३ मध्ये ग्रंथ छपाईचे दर

मंजूर करण्यात आले होते. लिबर्टी प्रिंटींग प्रेस,औरंगाबाद यांचेकडून छपाई होत आहे. कारण ग्रंथात समाविष्ट करावयाचे लेखांवर चार वेळा डी.टी.पी.करुन संपादकीय संस्कार करण्यात आले आहेत. ग्रंथ छपाईसाठी दोन लक्ष रुपयांची तरतुद आहे. ती पाच लक्ष करण्यात यावी. ग्रंथात ज्यांच्या लेखांचा समावेश करण्यात आला आहे. अशा लेखकांना प्रत्येकी सन्मान चिन्हासह यापुर्वी मंजूर झालेले रु.७५०/- ऐवजी प्रत्येकी रु.१०००/- देण्यात यावे.

D) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या सर्वोच्च अशा सल्लागार समितीने मंजुरी दिल्यानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय ग्रंथ पुरस्कार दि.२६ जानेवारी २००७ रोजी प्रदान करण्यात आले.सदरील पुरस्कार योजना दरवर्षी आयोजित करण्यांत यावी. या पुरस्कार योजने व्यतिरीक्त सुभेदार रामजी आंबेडकर,रमाबाई आंबेडकर,म.ज्योतीबा फुले,राजमाता जिजाऊ,सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज,वामनदादा कर्डक अशा नामवंतांच्या नावे विविध वाडमयीन प्रकारात पुरस्कार देण्यात यावेत, संदर्भ ग्रंथालय समृध्द होण्याच्या दृष्टीने आणि अधिकाधिक वाचक,लेखक,अभ्यासक, संशोधकांना या योजनेचा लाभ व्हावा हा उददेशही सफल होतो. या उपक्रमावर रु.३ लक्ष खर्च मान्यतेस्तव सादर.

E) डॉ.बाबासाहेब ग्रंथ पुरस्कार निवड समितीतील सभासदांना रु.१०००/- मानधन देण्याबाबत सल्लागार समितीने मान्य केले होते.२००६-०७ या वर्षी सदर स्पर्धेत एकुण २७६ ग्रंथ प्राप्त झाले. त्यातुन निवड करण्याचे काम जिकरीचे व कष्ट प्रद होते हे जाणून निवड समिती सभासदांनी मानधन वाढविण्यासंबंधी तोंडी सूचना केली या संदर्भात दि.२६.०१.०७ या पुरस्कार वितरण दिनी सभासदांनी मा.महापौर व मा.आयुक्तांची भेट घेऊन चर्चेअंती मानधन रु.३०००/- प्रति सभासद देण्यात आले. त्यास कार्योत्तर मान्यता मिळावी. तसेच सदर पध्दत भविष्यात देखील अंगीकारण्यात यावी.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार विजेत्यांना पुरस्कार स्विकारणेसाठी येणे जाणे, निवास,जेवण आदि खर्चासाठी पुरस्कार विजेत्या साहित्यीकांना अतिरीक्त मानधन देणे बाबत मा.महापौर आणि मा.आयुक्त यांनी तोंडी सुचित केल्यानुसार दि.२६.०१.२००७ च्या पुरस्कार वितरण सोहळयात प्रत्येकी रुपये २०००/- प्रमाणे अदा करण्यात आली. त्यास कार्योत्तर मान्यता मिळावी. तसेच भविष्यातही सदर पध्दत अवलंबावी.

F) राष्ट्रीय पातळीवर चर्चासत्राचे आयोजन करुन प्राप्त शोध निबंधाचे प्रकाशन व त्यावर मनपाचा मालकी हक्क या संदर्भाने आणि चर्चासत्राचे सल्लागार समितीने रु.२,५०,०००/- तरतूद मान्य केली होती. तथापी, या संदर्भाने आयोजित बैठकीत उपस्थित सभासदांनी ही रक्कम अपूर्ण असल्याचे सांगून ती किमान रु.१० लाख एवढी करण्यात यावी, असे सुचविले.सबब वरीलप्रमाणे तरतूद मान्य व्हावी.

G) डॉ.गंगाधर पानतावणे (सदस्य सल्लागार समिती) यांनी केलेल्या सूचनेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राकडे पी.एच.डी. चे विद्यार्थी,संशोधक,संशोधक मार्गदर्शक, महाविद्यालयीन व विद्यापीठ प्राध्यापक वर्ग, एम.फील. धारकाचे शोध निबंध,समाज कार्यकर्त्यांचे संशोधन,लेख/ हस्तालिखिते हे असे विविध दस्तावेज मनपाकडे मालकी हक्क घेऊन प्रकाशित करण्याच्या उद्देशाने तसेच मनपातील यशोगाथा ठळक घडामोडींना प्रसिध्दी देण्याच्या उद्देशाने संशोधन केंद्रात स्वतंत्र्य प्रकाशन सेल स्थापन करुन या सेल व्दारे महानगरपालिका बुलेटीन "नागरीक"या नावे दर महा प्रकाशित करण्यास मान्यता व्हावी.

H) संशोधन केंद्रामध्ये चार मजुर आणि एक समन्वयक एवढेच मनुष्यबळ आहे. संशोधन केंद्राच्या ध्येय धोरण व उद्दीष्टांची पुर्तता करावयाची झाल्यास उद्दिष्टानुरुप मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. समन्वयकाचे पदास समन्वयक ऐवजी संचालक असे करण्यात यावे. आणि केंद्रासाठी खालीलप्रमाणे मनुष्यबळ मान्य करण्यात यावे. सर्व पदे मानद व करार पध्दतीने असतील.

संचालक-१　　　　मानधन रु.५,०००/-　　दरमहा

कार्यक्रम समन्वयक तथा ग्रंथालय प्रमुख-१ मानधन रु.४,०००/- दरमहा
संगणक ऑपरेटर-१ मानधन रु.४,०००/- दरमहा

वरील मानधनावर रु.१,५६,०००/- वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

I) संशोधन केंद्राचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नीकरण असल्या कारणाने त्यांच्या निरीक्षण अहवालानुसार खालील प्रमाणे परिपूर्ण असे कॉम्प्युटर व्यवस्था असणे् आवश्यक आहे. तरी स्टेशनरी सह डी.टी.पी. डेटा,टॅली इंटरनेट,फॅक्स,लेजर प्रिंटर व वेबसाईट इ.व्यवस्था स्वतंत्र्यपणे व्हावी तसेच कॉम्प्युटर नांमांकित कंपनीचे खरेदी करण्यात यावे.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :कोणता निकष लावून सभासद घेतलेले आहे. ज्या पध्दतीने श्रीमंत शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय तसेच मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी ज्या पध्दतीने घेतले त्याचा विचार करावा जे कॉलीफाईड असतील त्यांची नियुक्ती करावी.या ठरावात मानधन देण्याचा विषय आहे. त्याच अनुशंगाने प्रशासनाच्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की शासनाने सिडको व महापालिकेसाठी ज्या ३४ विविध पदांना २० एप्रिल २००७ रोजी मान्यता दिलेली आहे त्या पदावर कुणावर अन्याय होणार नाही अशा पध्दतीने नियमाने भरती करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :जी सल्लागार समिती नियुक्त केली त्यात बदल होण्याची गरज आहे अनेक संस्था विनामूल्य काम करण्यास तयार आहे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयासाठी तसेच मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी ज्या पध्दतीने नियमावली तयार केली त्याप्रमाणे या बाबतीत ही सर्व पदाधिकारी मा.आयुक्त यांनी एकत्रित बसून निर्णय घेण्यात यावा तोपर्यत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

श्री.भगवान घडमोडे : सन २००३ मध्ये समिती स्थापन केली होती काही उपक्रम राबविण्याचे ठरविले होते आतापर्यत कोणते उपक्रम राबविण्यात आलेले आहे सभागृहाला माहिती नाही या शहराचे नाव उज्वल होण्यासाठी उपक्रम राबविणे आवश्यक आहे.जोख-या अर्थाने काम करण्यास तयार असेल अशांचीच नियुक्ती करावी.

श्री.गजानन बारवाल :गेल्या १० वर्षात प्रशासनाने कोणते चांगले उपक्रम राबविले याची सभागृहाला माहिती दयावी.

श्री.देसरडा प्रशांत :डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र असेल श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय असेल किंवा मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र असेल अशा मोठमोठया वास्तु महाराष्ट्रात कूठे ही नाही परंतू या शहरात त्या वास्तू सर्वांच्या सहकार्याने लाभलेल्या आहे. अनेक विकास कामे बाजूला ठेवून या वास्तू तयार केलेल्या आहेत यावर मोठा खर्च ही झाला परंतू ज्या उद्देशाने वास्तु उभारल्या त्या विषयीचे संशोधन काहीच केलेले दिसून येत नाही. संशोधन केंद्रात अधिकाऱ्याच्या विविध प्रशासकीय बैठका होत आहे. मुलाखती घेण्यात येत आहे हे बरोबर नाही ज्या चुका झालेल्या असतील सुधारणा करून यापूढे करू नये ही आपली कर्मभूमी आहे या वास्तु कोणत्या कामासाठी तयार केल्या याचा विचार होणे आवश्यक आहे. इतर कामे थांबवावी. यासंदर्भात सर्व पदाधिकारी एकत्र बसून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.संजय शिरसाट : महापालिकेचे अधिकारी कर्मचारी यांनी अनेक वेळा या संशोधन केंद्रात भेटी दिल्या असतील त्यात श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय असेल यासाठी मोठा खर्च केलेला आहे तसेच मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र असेल यासाठी १.५० कोटीच्या वर खर्च झालेला आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी दोन कोटीच्या आसपास खर्च केलेला असून सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समिती मध्ये झालेल्या निर्णयाच्या संदर्भात या संशोधन केद्रात अधिकाऱ्याच्या बैठका घेतल्या. जातात त्या बैठकीसाठी जो खर्च लागतो तो नियमात नसल्याने या संशोधन केद्रासाठी जी कमेटी असते त्या कमेटीच्या एका बैठकीसाठी ३ हजार खर्च दाखवून हा खर्च तिकडे अधिकाऱ्यांच्या बैठकीत झालेला खर्चात बरोबर केला जातो. सर्वसाधारण सभेला १०३ नगरसेवक, प्रेस, सुरक्षा कर्मचारी अधिकारी व इतर कर्मचारी असतात त्यावर सुमारे १० हजार खर्च होतो. व संशोधन केंद्राच्या बैठकीला कमी लोक असतात. संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा की या कमेटीच्या एका बैठकीत खरोखरच ३०००रू. खर्च होतो का?

प्रकल्प संचालक : सल्लागार समितीच्या बैठकीच्या वेळी जर सदस्यांची जेवणाची वेळ झाली व जेवण दिले तर खर्च होते.

श्री.संजय शिरसाट : प्रत्येक वेळी अधिकाऱ्यांना विचारणा केली तर या समितीच्या बैठकीला फक्त श्री. पानतावणे शिवाय कूणीही नसते असे उत्तर मिळते असे असेल तर एका व्यक्तीला जेवणासाठी ३ हजार खर्च होतो का? योग्य तो खुलासा करावा.

प्रकल्प संचालक : एका बैठकीला तीन सदस्य उपस्थित होते. ३०००रू खर्च अपेक्षित नाही. संपादकांना मानधन द्यावे लागते.

श्री.संजय शिरसाट : अधिका-यांच्या तेथे बैठका होतात त्या बैठकीचा खर्च भागविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केद्राच्या कमेटीच्या सदस्याच्या बैठकीचा ३ हजार रू प्रमाणे खर्च होतो. या सभागृहाची मंजूरी घेत आहे असा माझा आरोप आहे. प्रत्यक्षात या कमेटीसाठी ३०००/-रू. प्रत्येक बैठकीला खर्चच होत नाही.

याच वेळी सभागृहात मोठमोठयाने स.सदस्यांचे बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.

मा.आयुक्त :पुरावा नसतांना असा आरोप करणे योग्य नाही

श्री.संजय शिरसाट : कमेटीची पुर्णपणे केव्हा ही बैठक होत नाही. तर खर्च होतो म्हणून का दाखविले जाते.

याच वेळी मोठमोठयाने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :पूढील बैठकीत यावर निर्णय घेण्यात येईल.सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते (वेळ सांय. ५.१० वा.पुन्हा ५.२० वा. सभेला सुरूवात).

मा.महापौर :कोरम नसल्याने आजची सभा तहकूब करून उदया सकाळी ११.०० वाजता सभा घेण्यात येईल याची सर्व स.सदस्यांनी अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

या बरोबर आजची सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

निष्काम जन सेवाय समर्पिता

## दिनांक ११-१०-२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार **दिनांक ११ ऑक्टोबर २००७ (दिनांक १०.१०.२००७ रोजीची तहकूब सभा) रोजी** मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे् सकाळी १.०० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला प्र.मा.आयुक्त, नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बमने पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
११. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१२. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१३. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१४. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१७. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१८. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१९. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.श्रीमती शिंदे मीराबाई रामराव
२२. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२३. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२४. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२५. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२६. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२७. स.स.श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन
२८. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
२९. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३०. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव

३१. स.स.श्री.खान निसार मोहम्मद खान
३२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
३४. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
३५. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
३६. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
३७. स.स.डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
३८. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
३९. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
४०. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
४१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
४२. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
४३. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
४४. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
४५. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
४६. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
४७. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
४८. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
४९. स.स.श्री.जोशी संजय रामदास
५०. स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
५१. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
५२. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
५३. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
५४. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०२. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**चर्चा :**

श्री.अ.रशिद खान : कोरम नाही सभा तहकूब करून दुपारी ३.०० वाजता घेण्यात यावी.

मा.महापौर :स.माजी महापौर यांची सूचना लक्षात घेता कोरम नसल्याने सभा दुपारी ३.०० वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे दुपारी ३.०० वाजता सभेला सुरूवात होईल.(वेळ १.०५ वा. पुन्हा दु.३.१५ वा.सभेला सुरूवात)

मा.महापौर :कोरम नसल्याने सभा तहकूब करण्यात येते. सभा आयोजित करण्या संदर्भात स्वतंत्ररित्या तारीख व वेळ ठरवून स.सदस्यांना कळविण्यात येईल.

या बरोबरच आजची सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.